सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230716, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

## परीक्षा विभाग

## नोटीफिकेशन

## दीक्षांत समारंभ उपस्थितीसाठी नोंदणीबाबत

जा. क्र पनिका/2022/981 दिनांक : 29/04/2022

विद्यार्थी मित्रांनो, आपल्या विद्यापीठाचा २७ वा दीक्षांत (पदवीदान) समारंभ येत्या १७ मे २०२२ रोजी नाशिक येथे विद्यापीठ मुख्यालयातील प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये २०२०-२०२१ ह्या वर्षात उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. या प्रसंगी आपण विद्यापीठ मुख्यालय, नाशिक येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करण्यासाठी येणार असाल तर आपण https://convocation27.ycmou.ac.in या लिंकवर जाऊन आपल्या उपस्थिती बाबतची माहिती कृपयाऑनलाईन पद्धतीने भरावी. सदरची लिंक 29/04/2022 ते 08/05/2022 या कालावधीत सुरू राहील, या कालावधीतच नोंदणी करता येईल यास मुदतवाढ मिळणार नाही. आपण ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच आपणांस येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करता येईल.यासाठी आपणांस विद्यापीठ मुख्यालय, नाशिक येथे दिनांक १७/०५/२०२२ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता हजर राहून पदवीदान शाल रु. ३५०/- रोख भरून घ्यावी लागेल, शाल परत केल्यास आपणांस रु. ३५०/- परत करण्यात येतील अन्यथा आपणांस शाल विकत घेता येईल. पदवीदान समारोहासंबंधीची सर्व माहिती विद्यापीठ पोर्टलला समारंभापूर्वी प्रसिद्ध केली जाईल ती विद्यार्थ्यांनी पहावी.

विद्यार्थांना पदविका / पदवी ही ज्या विद्यार्थांनी उपरोक्त लिंकवर आपल्या उपस्थितीची बाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदवली आहे त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी प्रदान करण्यात येतील, ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची पदविका /पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीनंतर त्यांच्या अभ्यासकेंद्रामार्फत वितरीत केली जातील, त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही, आणि नोंदणी न करता डायरेक्ट आलेल्या विद्यार्थ्यांना पदवी देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**सूचना** : Ph.D. ह्या पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी येथे उपस्थितीबाबत माहिती नोंदविण्याची आवश्यकता नाही. त्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात आलेली आहे.

**परीक्षा नियंत्रक**

**प्रति,**

1) **सर्व विभागीय केंद्र – कृपया आपल्या अधिनस्तसर्व अभ्यासकेंद्रांना त्यांच्याकडील पात्र विद्यार्थ्यांना सुचित करावे.**
2) **सर्व विद्याशाखा संचालक**
3) **परीक्षा विभाग युनीट – 1,2,3 परीक्षा संगणक**
4) **मूल्यमापन विभाग**
5) **प्रेमनाथ सोनवणे – पोर्टलवर प्रसिध्दीसाठी**
6) **MKCL – YCMOU Unit**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक